# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 13/09/2019**

**सभा सुचना क्रं. 13**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **स्मशानभूमीत प्रेत दहनासाठी जळाऊ लाकडे पुरवठा कामाच्या मंजूर निविदेस सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरील विषयाबाबत चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, महानगरपालिकेची गैरसोय होऊ नये म्हणून आवश्यकतेनुसार मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. 570 दि. 11/02/2019 अन्वये मंजूर निविदाधारक मे. शंकर टिंबर ट्रेडिंग,विरार (पुर्व) यांचे कडून मंजूर दराने खरेदी केलेल्या जळाऊ लाकूड खरेदी कामी रक्कम रु. 70 लक्ष इतक्या खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. व वेळोवेळी येणारी देयके अदा करण्यास आजची सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.88 मध्ये भोयदापाडा येथे संकल्प इंडस्ट्री जवळ रोड क्रॉस पाईपड्रेन, जुने गटार दुरुस्ती व वॉर्ड क्र.105 मध्ये जुचंद्र येथे सनटेक संकुल जवळ रोड क्रॉस पाईप ड्रेंन बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रक्कम रु. 33,30,765/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास आजची सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाहीस करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड क्र.88 मध्ये इंडस्ट्री ते सागर प्लाझा इंडस्ट्री पर्य़ंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर कामाकरीता बी-1 प्रकारची ई-निविदा मागविण्यास तसेच सदर कामाच्या रक्कम रु.37,45,814/- च्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. हया कामी निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 4. | **अग्निशमन केंद्र अधिकारी/ उप-अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर ठेका पध्दतीने नेमणूक करणेबाबत.** | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी प्रस्तावात नमुद केल्यानुसार सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी ठेके पध्दतीने सात पदांकरीता प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन अग्निशमन विभागात सहाय्यक केंद्र अधिकारी एकूण सात पदे अभिकर्त्यामार्फत घेण्याकरीता मान्यता देण्यांत येत आहे. त्यास अनुसरून सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी एकूण 7 पदे सन 2019-20 ते 2020-2021 या दोन वित्तीय वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने भरणे कामी व येणाऱ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.ज्योती धोंडेकर सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **प्रभाग क्र. अ मधील विरार (पू) प्रभाग क्र. 15 मध्ये मिथिलाधाम येथे 10 सीटचे शौचालय बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. 8 दि. 28.04.2015 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया मे. मेहूल अरविंद वर्तक यांच्या अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकाचे कलम 73 (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांनी मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम 73 (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. हार्दिक राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.67 मधील लसाविर येथील दीपक चौधरी चाळ ते मुख्य नाल्यापर्यंत गटार करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. सदर कामी मे. महेश सातपुते यांची निविदा 15.50% कमी दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त हयांनी मा. स्थायी समिती कडे शिफारस केली आहे मा. आयुक्त याचे शिफारशी नुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. हार्दिक राऊत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई विरार शहर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| 7. | **श्री. चंद्रकांत विठ्ठल मोरे, सफाई कामगार यांचे अपिलावर निर्णय घेणेबाबत.** | **ठराव :-** सदर प्रस्तावावर विचार विनीमय करून आजची मा.स्थायी समिती सभा सदर प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे. तसेच सदरच्या प्रस्तावाबाबत स्वयंस्पष्ट अहवाल पुढील स्थायी समिती सभेत ठेवण्यांत यावा, असा निर्णय देण्यांत येत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्रीम.ज्योती धोडेंकर सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत विजयनगर तुळींज येथील कार्यरत डायलेसीस विभाग बाहययंत्रणेद्वारे (Out Sourcing) उपलब्ध करणेकामी सन 2019-20 , सन 2020-21 व सन 2021-22 या वित्तीय वर्षाकरीता मागविण्यात आलेल्या अभिव्यक्ती स्वारस (EOI) पैकी लघुत्तम दराची अभीव्यक्ती स्वारस्य मंजूर करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदरचा विषय हा मा.स्थायी समिती सभा दि.11/09/2019 रोजीच्या सभेतील विषय क्र.58 मंजूर असल्याने तो पुन:श्च विषय पत्रिकेवर आल्याने सदरचा विषय बाद करण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**